# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** धरमपेठ झोन क्र. २ अंतर्गत मौजा–पांढराबोडीयेथील
**{कार्य. अभियंता झोन क्र. २}** नगर भूमापन क्र. ४६१, क्षेत्रफळ ७२.० चौ.मी. क्षेत्रफळातील शिकस्त असलेले संडास तोडण्याचे प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्याबाबत.

मौजा–पांढराबोडी येथे म.न.पा. चे मालकीचे जागेवर बांधण्यात आलेले सार्वजनीक संडास अंत्यत षिकस्त असल्याने. मा. आमदार पश्चिम नागपूर यांनी नागपूर सुधार प्रन्यास मार्फत या जागेवर योगा भवन बांधकामाचा प्रस्ताव तयार केलेला असून. नागपूर सुधार प्रन्यास मार्फत महानगरपालिकेस सदहू शिकस्त बांधकाम पाडून येथे योगा भवनाचे बांधकाम करण्यास नाहरकत पत्र देण्याची पत्राव्दारे विनंती केली आहे. सदहू पत्राची प्रत नस्तीत संलग्न आहे. सदहू पत्राचे अनुषंगाने विभागामार्फत मौका तपासनी करण्यात आली असून या ठिकाणी असलेले सार्वजनीक संडास अतिशय शिकस्त व वापरात येण्यासारख नाहीत. यास्तव आरोग्या विभागाचा अभिप्राय सुध्दा घेण्यात आला असून त्यांनी सुध्दा सदर संडास उपयोगात नसल्याने पाडण्यास हरकत नसल्याचे नस्तीत नमूद आहे. करीता या जागेवर असलेले शिकस्त संडास पाडण्याची व नागपूर सुधार प्रन्यास ला स्थावर विभागा मार्फत या ठिकाणी योगा भवन बांधण्यास्तव नाहरकत पत्र देण्याबाबत विषय मंजूरीस्तव विचारात घेणे.

टिप :–

१ प्रस्तूत विषयासंबधाने नागपूर सुधार प्रन्यास मार्फत सादर अर्जाची प्रत तसेच सदहू जागेचे मालमत्ता पत्रकाची प्रत नस्तीत संलग्न आहे.

२ मौका निरीक्षण अहवाल व शिकस्त बांधकामाचे छायाचित्र नस्तीत टाचन आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- २४/मनपा/प्रशासक** **दिनांक :- २७/०६/२०२२**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (झोन क्र. २), सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार धरमपेठ झोन क्र. २ अंतर्गत मौजा–पांढराबोडी येथील नगर भूमापन क्र. ४६१, क्षेत्रफळ ७२.० चौ.मी. क्षेत्रफळातील शिकस्त असलेले संडास तोडण्याचे प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्याबाबत.

मौजा–पांढराबोडी येथे म.न.पा. चे मालकीचे जागेवर बांधण्यात आलेले सार्वजनीक संडास अंत्यत शिकस्त असल्याने. मा. आमदार पश्चिम नागपूर यांनी नागपूर सुधार प्रन्यास मार्फत या जागेवर योगा भवन बांधकामाचा प्रस्ताव तयार केलेला असून. नागपूर सुधार प्रन्यास मार्फत महानगरपालिकेस सदहू षिकस्त बांधकाम पाडून येथे योगा भवनाचे बांधकाम करण्यास नाहरकत पत्र देण्याची पत्राव्दारे विनंती केली आहे. सदहू पत्राची प्रत नस्तीत संलग्न आहे. सदहू पत्राचे अनुषंगाने विभागामार्फत मौका तपासनी करण्यात आली असून या ठिकाणी असलेले सार्वजनीक संडास अतिशय शिकस्त व वापरात येण्यासारख नाहीत. यास्तव आरोग्या विभागाचा अभिप्राय सुध्दा घेण्यात आला असून त्यांनी सुध्दा सदर संडास उपयोगात नसल्याने पाडण्यास हरकत नसल्याचे नस्तीत नमूद आहे. करीता या जागेवर असलेले शिकस्त संडास पाडण्याची व नागपूर सुधार प्रन्यास ला स्थावर विभागा मार्फत या ठिकाणी योगा भवन बांधण्यास्तव नाहरकत पत्र देण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**